**रयत शिक्षण संस्था, सातारा**
**परिपत्रक क्र.१४**
**दि.१६/०५/२०२५**

# परिपत्रक

**विषय : सन २०२५-२६ बदल्यांसाठी बदलीपात्र सेवकांनी विकल्प भरणेबाबत. . .**
**संदर्भ : संस्थेकडील परिपत्रक क्र.५० दि.२५/०२/२०२५**

रयत सेवकांच्या बदल्यांबाबत सुधारित धोरण २०२५-२६ परिपत्रक क्र.५० दि.२५/०२/२०२५ ने निर्गमित करण्यात आलेले आहे. सन २०२५-२६ बदल्यांची कार्यवाही सध्या प्रगतीपथावर आहे. बदलीपात्र सेवकांच्या बदल्या Online केल्या जाणार आहेत. त्यासाठी Software करण्यात आले आहे. त्याकरिता बदली पात्र शिक्षकांकडून विकल्प मागविण्यात येत आहेत. बदलीपात्र सेवकांनी विकल्प भरणे आवश्यक आहे.

## * रयत सेवकांसाठी Online बदल्यांचे विकल्प भरण्याबाबतच्या सूचना

१. सदर परिपत्रकासोबत बदलीपात्र सेवकांची यादी जोडलेली आहे व सदर यादी संस्थेच्या **www.rayatshikshan.edu** या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे.

२. शाखाप्रमुख यांनी सदर यादी आपल्या शाखेतील बदली पात्र सर्व सेवकांच्या निदर्शनास आणावी.

३. आपल्या शाखेतील बदलीपात्र सेवकांना Online Transfer फॉर्म भरणेबाबत सूचना द्याव्यात.

४. शाखाप्रमुखांनी आपल्या शाखेतील बदली पात्र सेवकांच्या ई-मेलवर सदरचे परिपत्रक पाठवावे व त्याचा Sent Report प्रिंट काढून शाखा दप्तरी ठेवावी.

५. शाखाप्रमुखांनी Sent Report higher@rayatshikshan.edu या ईमेल वर पाठवावा.

बदलीपात्र यादीतील सेवकांनी त्यांचा Online Transfer Form भरण्यासाठी **https://senior.transfer.rayaterp.in** या लिंकमध्ये Login करुन फॉर्म भरावा.

६. फॉर्म भरताना Login करण्यासाठी सेवकाने त्याचा HRMS Code वापरावा व passward या ठिकाणी स्वत:चा aadhar क्रमांक वापरावा.

७. बदलीपात्र सेवकांनी Online बदली विकल्प फॉर्म भरताना त्यांच्या विषयाच्या जेवढ्या रिक्त जागा दिसतील तेवढे सर्व विकल्प भरणे अनिवार्य आहे.

सदर यादीतील **सर्व सेवकांनी आपले विकल्प दि.१७/०५/२०२५ ते दि.२०/०५/२०२५ या कालावधीत भरणे अनिवार्य राहील.** बदलीपात्र सेवकाने विकल्प न भरल्यास त्यांची संस्था पातळीवर प्रशासकीय बदली केली जाईल.

**सचिव**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

**प्रत माहितीसाठी -**

१. मा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
२. मा.व्हाईस चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
३. सहसचिव(उ.शि), रयत शिक्षण संस्था, सातारा
४. सहसचिव(माध्य.), रयत शिक्षण संस्था, सातारा
५. सहसचिव(ऑडिट), रयत शिक्षण संस्था, सातारा

**प्रत कार्यवाहीसाठी -**

६. प्राचार्य, सर्व महाविद्यालये, रयत शिक्षण संस्था.